# फ्लिपकार्टच्या किराणा भागीदारांनी २०२० मध्ये सरासरी मासिक डिलिव्हरी उत्पन्नात अनुभवली सुमारे ३० टक्के वाढ

- *दक्षिणेकडील किराणा दुकानांनी मासिक उत्पन्नात सर्वाधिक वाढ अनुभवली, त्यानंतर पूर्व, पश्चिम आणि उत्तरेची वाढ*
- *आघाडीच्या शहरांमध्ये हैदराबादमधील किराणा भागीदारांनी डिलिव्हरी उत्पन्नांमध्ये सर्वाधिक वाढ अनुभवली, त्यानंतर अहमदाबाद, मुंबई, बंगळुरु आणि पुण्याचा क्रमांक*

**बंगळुरु - २१ मे २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील एत्तदेशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आज प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार देशभरातील किराणा भागीदारांच्या मासिक डिलिव्हरी उत्पन्नात २०२० मध्ये सुमारे ३० टक्के वाढ झाली आहे. भारतात सर्वाधिक काळापासून असलेल्या या रिटेल क्षेत्राचे उत्पन्न वाढवण्याची आणि डिजिटल माध्यमातून त्यांच्यासाठी नव्या संधी निर्माण करण्याची फ्लिपकार्टने या भागीदारीत जपलेली बांधिलकीच यातून अधोरेखित होते.

फ्लिपकार्टच्या किराणा उपक्रमाचा भाग म्हणून जनरल स्टोअर्स, टेलरची दुकाने अशा अनेक मॉम-ॲण्ड-पॉप स्टोअर्सनी फ्लिपकार्टसोबत भागीदारी करून ग्राहकांना लाखो डिलिव्हरीज घरपोच दिल्या आणि यातून स्वत:साठीही उत्पन्नाचे नवे मार्ग निर्माण केले.

फ्लिपकार्टच्या माहितीनुसार, दक्षिणेकडील किराणा भागीदारांच्या मासिक डिलिव्हरी उत्पन्नात सर्वाधिक वाढ झाली आहे. त्याखालोखाल पूर्व, पश्चिम आणि उत्तरेकडील भागीदारांनी वाढ अनुभवली. आघाडीच्या शहरांमध्ये हैदराबादमधील किराणा भागीदारांनी सर्वाधिक वाढ अनुभवली. त्या खालोखाल अहमदाबाद, मुंबई, बंगळुरु आणि पुण्यातील भागीदारांना फायदा झाला. किराणा डिलिव्हरी उपक्रमातून अनेक किराणा भागीदारांना फायदा होत आहे. लॉकडाऊनच्या काळात त्यांना आर्थिकदृष्ट्या तगून राहण्यात या उपक्रमाचे साह्य झाले आहे.

**फ्लिपकार्टचे सीनिअर व्हाईस प्रेसिडंट आणि चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिस रजनीश कुमार** म्हणाले, "*नाविन्यपूर्ण भागीदारीच्या माध्यमातून देशभरातील किराणा व्यावसायिकांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना डिजिटली सक्षम करून किराणा क्षेत्राच्या विकासास फ्लिपकार्ट ग्रूप बांधिल आहे. देशातील सर्वात जुना आणि सर्वाधिक विश्वासार्ह रिटेल व्यवसाय म्हणून किराणा दुकाने भारतातील रिटेल परिसंस्थेतील एक महत्त्वाचा भाग आहेत आणि आम्ही एक एतद्देशीय संस्था म्हणून त्यांच्यासोबत विविध माध्यमातून स्वत:ला जोडून घेत त्यांना ई-कॉमर्सच्या दृष्टिकोनातून नवे स्वरूप आणि नवे स्थान देण्याचा प्रयत्न करत आहोत. ग्राहकांना घरपोच सेवा देणे हा एक अत्यंत यशस्वी किराणा उपक्रम ठरला आहे. आमच्या किराणा भागीदारांची प्रगती आणि समृद्धीची ही वाटचाल पाहताना आम्हाला आनंद होतो.*"

फ्लिपकार्टने विविध व्यवसाय पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून किराणा भागीदारांना त्यांच्या डिलिव्हरीसाठी व्यापक प्रमाणात शिपमेंट उपलब्ध होतील आणि त्यांच्या उत्पन्नाला जोड मिळेल याची खातरजमा केली आहे. त्यांना यासाठी सर्वसमावेश प्रशिक्षणही दिले जाते. यात डिलिव्हरीतील खाचाखोचा समजावून सांगणे, ॲपचा वापर आणि ग्राहकसेवा यांचा समावेश असतो.

फ्लिपकार्टप्रमाणेच, २०१९ मध्ये सादर झालेल्या या उपक्रमाचा उद्देश आहे ग्राहकांपर्यंत विशेषत: द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचणे आणि त्याचवेळी किराणा दुकानदारांना उत्पन्नाचा अतिरिक्त मार्ग मिळवून देणे. उत्पन्नाचा अतिरिक्त मार्ग उपलब्ध झाल्याने किराणा भागीदारांना कुटुंबाचे खर्च, मुलांच्या शिक्षणासाठी बचत करणे, कर्जाची परतफेड आणि इतर वैयक्तिक गरजा भागवणे शक्य झाले.

त्याचप्रमाणे, फ्लिपकार्टने फ्लिपकार्ट होलसेल बेस्ट प्राइज कॅश-ॲण्ड-कॅरी व्यवसायाच्या माध्यमातून देशातील नऊ राज्यांमधील लाखो किराणा दुकानदारांना सेवा दिली आहे. या व्यवसायाअंतर्गत किराणा दुकानदारांना स्पर्धात्मक किमतीत दर्जेदार मालाची व्यापक श्रेणी, उत्पादनांची घरपोच डिलिव्हरी आणि सोयीचे पेमेंट पर्याय उपलब्ध होतात. वर्षभर बेस्ट प्राइज उपक्रमाने वाहतूक आणि लॉजिस्टिकमध्ये वितरक भागीदारांच्या साथीने काम केले आहे आणि त्यातून ई-कॉमर्स आणि डिलिव्हरी क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. सदस्यांना जागतिक संकटाच्या काळातही अगदी सहज उत्पादने ऑर्डर करता येतील आणि मिळवता येतील याची खातरजमा यामुळे झाली आहे.

**About Flipkart:**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

For more information, please contact media@flipkart.com